# फॉरेस्ट डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन ऑफ महाराष्ट्र लिमिटेड

(महाराष्ट्र शासनाचा उपक्रम)
CIN: U45200MH1974SGC017206
पंजि कार्या. : एफडीसीएम भवन, 359/बी, हिंगणा रोड, अंबाझरी, नागपूर - 440 036

Website: www.fdcm.nic.in

## एफडीसीएम लि. साठी कॉर्पोरेट प्लॅन तयार करण्याच्या विवक्षित कामासाठी आवश्यक योग्यतेबाबत विवरण आणि अटी व शर्ती

फॉरेस्ट डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन ऑफ महाराष्ट्र लिमीटेडसाठी कॉर्पोरेट प्लॅन तयार करण्याच्या विवक्षित कामासाठी आवश्यक योग्यतेबाबत तज्ञ/अनुभवी इच्छूक व्यक्तींकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | विवक्षीत कामाचा प्रकार | विवक्षीत कामे | अर्जदाराची आवश्यक योग्यता (Qualification) |
|---|---|---|---|
| १ | कॉर्पोरेट प्लॅन तयार करणे | वन विकास महामंडळाकरीता कॉर्पोरेट प्लॅनमध्ये खालील बाबींचा अंतर्भाव असावा.<br>१) वन विकास महामंडळाची उत्पादन क्षमता वाढविण्यासाठी उपाययोजना.<br>२) वन विकास महामंडळाचा उद्दिष्ट अद्ययावत करणे.<br>३) वन विकास महामंडळाच्या व्यवसायात विविधता आणणे.<br>४) वन अधिकारी / कर्मचारी यांची क्षमता व दर्जा उंचविण्यासाठी उपाययोजना.<br>५) वन अधिकारी / कर्मचारी यांच्या आवश्यकतेबाबत अभ्यासपूर्ण नियोजन. | १) वनव्यवस्थापन, वन्यजीव व्यवस्थापन, वन उत्पादन व त्याचा विनियोग याबाबत कमीतकमी १० वर्षाचा अनुभव असावा.<br>२) IIFM मध्ये कमीत कमी ३ वर्ष faculty म्हणून काम केल्याचा अनुभव असल्यास, प्राधान्य देण्यात येईल.<br>३) संगणकाचे ज्ञान आवश्यक.<br>४) वयोमर्यादा ६५ वर्षापेक्षा जास्त नसावी.<br>५) शारीरीकदृष्ट्या व मानसिकदृष्ट्या सक्षम असावा. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | ६) निम्नस्तरापर्यंत संगणीकरणाचा जास्तीत जास्त उपयोग वाढविण्यासाठी उपाययोजना.<br>७) वन विकास महामंडळातील खर्च कमीत कमी करण्यासाठी उपाययोजना.<br>८) वन विकास महामंडळाकडे निधीची उपलब्धता वाढविण्यासाठी **आयपीओ (Initial Public Offer)** चे माध्यमातून निधी वाढविणे योग्य राहील किंवा कसे याबाबत अभ्यासपूर्ण अभिमत. | |

अटी व शर्ती :

१) एफडीसीएम लि.कडून कार्पोरेट प्लॅन तयार करण्यासंबंधीचे काम सोपविल्यापासून ३ महिण्याच्या आत पूर्ण करावे लागेल.

२) कार्पोरेट प्लॅन तयार झाल्यानंतर त्यास अंतिम स्वरूप देण्यापूर्वी त्याबाबत सादरीकरण व्यवस्थापकीय संचालक व त्यांनी मान्यता दिलेल्या समितीसमोर करावे लागेल व त्यांनी सुचविलेले आवश्यक ते बदल / सूचना त्याचा अंतर्भाव कार्पोरेट प्लॅनला अंतीम स्वरूप देताना समाविष्ट करावा लागेल.

३) कार्पोरेट प्लॅनला अंतीम स्वरूप प्राप्त झाल्यानंतर त्याच्या 3 हार्डकॉपी व १ सॉफ्टकॉपी सादर करणे आवश्यक राहील.

४) कार्पोरेट प्लॅन तयार करण्याकामी अपेक्षित सल्लामसलत शुल्क (Consultancy charges) अर्जामध्ये नमूद करावे.

५) केंद्र व राज्य शासनाचे प्रचलित नियमानुसार जीएसटी, टीडीएस व तत्सम आकार / शुल्क, मंजूर सल्लामसलत शुल्कातून वसूल करण्यात येईल.

६) कार्पोरेट प्लॅन तयार करणेकामी आलेले अर्ज स्विकारण्याचा किंवा नाकारण्याचा संपूर्ण अधिकार व्यवस्थापकीय संचालक, एफडीसीएम लि. नागपूर यांचा राहील.

तरी इच्छूक अर्जदार यांनी आपले अर्ज संपूर्ण बायोडाटासह व आवश्यक त्या कागदपत्राच्या स्वसाक्षांकित प्रतीसह दि. २७/०३/२०१८ पर्यंत **md@fdcm.nic.in** या ई-मेलवर अथवा पोस्टाने या कार्यालयास वरील पत्त्यावर सादर करावेत.

स्थळ : नागपूर
दिनांक : १७/०३/२०१८

व्यवस्थापकीय संचालक
फॉरेस्ट डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन ऑफ महाराष्ट्र लिमीटेड